संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# स्वच्छता म्हणजे स्वयंशिस्तीचा एक भाग

सध्या देशभर स्वच्छता अभियानाची जोरदार तयारी सुरू आहे. अनेक नामवंत व्यक्ती हातामध्ये झाडू घेऊन रस्ते किंवा आपला परिसर झाडण्यासाठी पुढे येताना दिसतात. निदान तसे फोटो तरी छापून येत आहेत. सचिन तेंडुलकरपासून ते अभिनेता परेश रावलपर्यंत किंवा अनिल अंबांनीपासून हेमामालिनीपर्यंत अनेक सेलिब्रिटिज स्वच्छता मोहिमेत सहभागी होताना दिसतात. एक गोष्ट मान्य करावी लागेल की, भारताच्या सर्वभागामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आहे. लोकांना आपला परिसर आपले गाव स्वच्छ राहावे असे मनापासून वाटत नाही. सगळ्या मोठ्या शहरांमध्ये जाणवणारे घाणीचे साम्राज्य आणि खेड्यापाड्यांमध्ये स्वच्छतेबाबतीत होणारी उदासीनता जाणवल्याशिवाय राहत नाही. लोकांना स्वच्छतेची आवड का नसावी किंवा त्याची जाणीव का नसावी याची कारणे शोधली तर ती अतिशय साधी असल्याचे दिसून येते. आपल्या देशात लोकशाही आहे. लोकशाहीच्या नावाखाली मनमौजी स्वातंत्र्य उपभोगण्याची सवय लागली आहे. नियम पाळायचे नाहीत. चांगल्या सवयी लावून घ्यायच्या नाहीत स्वच्छता ठेवणे यासाठी कोणावर जबरदस्ती करणे अनेकांना पटत आवडत नाही, कारण या स्वच्छतेच्या सवयीमध्ये एक प्रकारचे अनुशासन दडलेले असते. ज्याला स्वयंशिस्त म्हणता येईल. ती लावून घेण्याची इच्छाच अनेकांमध्ये नसते आणि म्हणून आपल्या देशात एवढ्या प्रमाणावर अस्वच्छता पहायला मिळते, लोकांना ही सवय नसल्यामुळे नरेंद्र मोदींना ही मोहीम जाहीर करावी लागली. सगळ्यांनाच स्वच्छता हवी असते. आपले गाव, घर, परिसर शहर स्वच्छ राहावे वाटत असते; परंतु ते ठेवण्याचे काम आपले नाही तर ग्रामपंचायत नगरपालिका किंवा महापालिकेचे आहे असेच सगळ्यांना वाटत राहते; परंतु यामध्ये आपलीदेखील काही जबाबदारी आहे निदान प्रत्यक्ष साफसफाई करता येत नसली तरी आपण कचरा टाकणार नाही किंवा घाण करणार नाही ही एवढी जबाबदारी प्रत्येकजण नक्कीच उचलू शकतो यासाठीच स्वच्छता ही जेवढी व्यक्तिगत सवय आहे तेवढीच ती सामूहिक स्वयंशिस्त आहे हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे.

### प्रत्येकाने सवय लावून घ्यावी

खरे तर आज साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. शहरांमध्ये सुशिक्षित आणि उच्चशिक्षित लोकांचे प्रमाणही जास्त असते. प्रत्येकाला स्वच्छतेची जाणीव असते मात्र प्रत्यक्ष कृती करण्याची ज्यावेळेला वेळ येते त्यावेळेला स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जाते. अगदी मुंबई पुणे नागपूरसारख्या मोठ्या शहरांचे उदाहरण घेतले तरी चांगले शिकले, सवरलेले लोक सार्वजनिक ठिकाणीसुध्दा घाण करताना दिसतात. रेल्वे स्टेशन, बस स्टॉप ही सार्वजनिक ठिकाणे प्रवाशांनी टाकलेल्या कचऱ्यामुळे तुडुंब भरलेली असतात. अनेकांचा असा गैरसमज आहे की, रस्त्यांची किंवा रेल्वे स्थानकांची सफाई त्या त्या विभागाने केली पाहिजे. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी रस्ते झाडले पाहिजेत; परंतु हा अर्धवट प्रकार ठरतो कारण दिवसातून एकदा किंवा दोनवेळा सार्वजनिक ठिकाणची साफसफाई केली जाते. मात्र या ठिकाणाचा वापर करणाऱ्या लोकांनी जर तिथे सतत कचरा टाकण्याचे काम केले तर त्याचा दोष महापालिकेला किंवा सफाई कामगारांना देता येणार नाही, कारण लोकांनीदेखील आपली योग्य ती जबाबदारी पाळली पाहिजे. ही जबाबदारी म्हणजेच स्वत:ला शिस्त लावून घेण्याची तयारी ठरते. जी आज लोकांमध्ये दिसत नाही जर प्रत्येकाने जाणीवपूर्वक स्वच्छतेची सवय लावून घेतली तर आपोआप ही मोहीम यशस्वी होऊ शकते. नरेंद्र मोदी यांनी एका आवश्यक गोष्टीसाठी पुढाकार घेतला आहे. ज्यामुळे लोकांना आपण एका राष्ट्रीय कामामध्ये सहभागी होऊ शकतो असे वाटेल आणि आपलीदेखील या देशाचे नागरिक म्हणून काही जबाबदारी आहे याची जाणीव निर्माण होईल, असे उपक्रम समाजामध्ये झाले पाहिजेत आणि जास्तीत जास्त उपक्रमांमध्ये जनतेला सहभागी करून घेतले पाहिजे, असा गोष्टींमुळे सगळीच कामे सरकारने करायची नसतात किंवा सगळी जबाबदारी सरकारवर टाकून चालत नाही, याचीदेखील हळूहळू जाणीव होत राहील.

### परदेशामध्ये दंड होतो

खरे तर स्वच्छता ही इतकी व्यक्तिगत आणि खाजगी स्वरूपाची अनिवार्य गोष्ट आहे की, ती दुसऱ्याने आपल्याला सांगण्याची वेळच पडू नये दुर्दैवाने हे घडले नाही म्हणून स्वच्छतेसारख्या साध्या विषयासाठी थेट पंतप्रधानांना राष्ट्रीय मोहीम हाती घेण्याची वेळ आली. यावरूनही समाजामध्ये आरोप आणि प्रत्यारोप आणि टीका होत आहे. केवळ प्रसिध्दीसाठी ही स्वच्छता मोहीम असल्याचे आरोप होत आहेत; परंतु यातल्या राजकीय हेतूकडे दुर्लक्ष केले पाहिजे, कारण समाजाचे आरोग्य आणि गाव, शहर या ठिकाणचे वातावरण आनंदी आणि सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छतेची नितांत गरज आहे. आपण अमेरिका इंग्लंडमधल्या स्वच्छतेचे कौतुक करतो; परंतु इथले लोक त्या ठिकाणचे नियम काटेकोरपणे पाळतात रस्त्यांवर कागद किंवा केळीची साल जरी टाकली तरी त्यांना दंड पडतो एवढेच नव्हे तर कुत्रा पाळणाऱ्यांनी त्याला बाहेर फिरायला नेल्यानंतर त्या कुत्र्याने केलेली घाण स्वत: त्या मालकाला उचलावी लागते. अशा प्रकारची सामाजिक शिस्त मोठ्या प्रगत देशामध्ये पाळली जाते. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाला तर स्वच्छतेच्या सामाजिक शिस्तीची आणखीनच जास्त आवश्यकता आहे. आतापर्यंत लोकशाहीच्या नावाखाली सगळेच जण अमर्याद स्वातंत्र्य उपभोगत असतात. हक्क आणि अधिकार याची सगळेच जण मागणी करीत असतात; परंतु याच लोकशाहीने आधी कर्तव्यदेखील सांगितली आहेत ती पाळली गेली पाहिजेत. देशातली पन्नास टक्के कामे अशी आहेत की, जी सरकार आणि जनता हे मिळून करू शकतात. एकमेकांच्या सहभागातून परस्पर विश्वासही निर्माण होऊ शकतो. स्वच्छता मोहिमेच्या निमित्ताने जर असे विश्वासपूर्ण वातावरण निर्माण होत असेल तर त्याचे महत्त्व आणखीनच वाढते. या मोहिमेतल्या प्रसिध्दीचा आणि जाहिरातबाजीचा भाग सोडून दिला तरीसुध्दा आज ती समाजाची आणि देशाची गरज आहे हे नाकारता येत नाही.